# पोलीस स्टेशन आर्वी यांची अवैध दारु वाहतुक करणाऱ्यावर कार्यवाही एकुण ४०,५००/- रु. चा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन आर्वी येथे दि.२८.१२.२०२० रोजी रात्रदरम्यान मुखबीरचे खात्रीशीर माहितीवरुन देऊरवाडा रोड, आर्वी येथे मोहन हॉटेल समोर नाकेबंदी करण्यात आली असता आरोपी १) एकनाथ नागोराव साठवणे, वय ४० वर्ष, रा. नांदपुर, ता. आर्वी, २) पृथ्वीराज लहुजी जाधव, वय २७ वर्ष, रा. छिंदवाडी, ता. तिवसा, जि. अमरावती यांचे ताब्यातील एका मारुती ८०० चारचाकी वाहनात ५ प्लास्टीक कॅनमध्ये १०० लीटर गावठी मोहा दारु वाहनासह कि. ४०,५०० रु. चा माल मिळुन आल्याने पो.स्टे. ला अप.क्र. ६६०/२०२० कलम ६५ (अ) (ई), 83 म.दा.का R/W १३०, १७७ मो.वा.का. अन्वये कार्यवाही करुन वरील प्रमाणे मुद्देमाल हस्तगत करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक, वर्धा श्री प्रशांत होळकर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगाव श्रीमती तृप्ती जाधव यांचे मार्गदर्शनात मा. पोलीस निरीक्षक श्री. संजय गायकवाड यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार प्रविण सदावर्ते, राहुल देशमुख नेमणूक पोलीस स्टेशन आर्वी यांनी केली.